**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-202**

# महाविद्यालयीन युवकांसाठी युवा संवाद भारत २०४७ अभिनव कल्पना : डॉ. चौगुले

▲ पाटण, दि. २६ : आपल्या देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्त्वाची भूमिका आहे. एनएसएसचा स्वयंसेवक हा प्रामाणिकपणे स्वयंशिस्त पाळत असतो. आपले उज्वल भविष्य गाठत असतानाच समाज आणि राष्ट्राची सेवा करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाद्वारे महाविद्यालयीन युवक करत असतो, म्हणून महाविद्यालयीन युवकांसाठी युवा संवाद भारत २०४७ ही एक अभिनव कल्पना आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे एनएसएसचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणमध्ये युवा संवाद भारत २०४७ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक संजीव चव्हाण होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे, पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. चौगुले म्हणाले, भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे आणि २०४७ हे आपले लक्ष्य आहे. देशाची एकता व अखंडता टिकविणे आपले काम आहे. भारताला महासत्ता बनविण्यासाठी युवकांचे योगदान फार मोठे असणार आहे तसेच शिक्षणातून समाजसेवा व समाजसेवातून शिक्षण यासाठी एनएसएस असते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानावरून संजीव चव्हाण म्हणाले, स्वप्नातील भारत देश साकारण्याचे काम तरुणानी हातात घेतले पाहिजे. जागतिक बदलाला सकारात्मकतेने सामोरे जा. मोबाइलच्या जास्त आहारी जावू नका. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याची ओळख करून देणे आहे.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, एनएसएसच्या माध्यमातून पर्यावरणसंबंधी जनजागृती केली पाहिजे. आजचा युवक जर जागृत झाला तर तो समाजाला योग्य दिशा देवू शकतो. २०४७ चा नवा भारत जगापुढे एक आदर्श निर्माण करेल.

प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना युवा संसद या उपक्रमाची माहिती दिली. प्रा. सौ. पी. आर. मोरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले.

कार्यक्रमास ज्युनिअर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, डॉ. एस. एस. तडाखे, प्रा. लक्ष्मण गणगे, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. सौ. टी. आय. पाटणकर, प्रा. सौ. गव्हाणे, प्रा. व्ही. आर. शिर्के, प्रा. एस. जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.



**मार्गदर्शन करताना डॉ. टीं. एम. चौगुले, व्यासपीठावर संजीव चव्हाण, डॉ. एस. डी. पवार, डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे व प्रा. दीपक दाभाडे.**